REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER – 2017



# वामन होवाळांच्या कथेतील वैचारिकता

**डॉ. शशिकांत ना. खिलारे**
**मराठी विभाग प्रमुख , श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली.**

**प्रस्तावना :**

साठोत्तरी मराठी कथा विश्वास अनेक नवनवे साहित्य प्रवाह निर्माण झाले. समाजातील वेगवेगळ्या थरातील लोकांनी आपापले अनुभवविश्व साहित्यातून मांडले आहे. मराठी साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहाला नाकारून दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे अनेक नवे साहित्य प्रवाह निर्माण झाले. या साहित्य प्रवाहांनी विशेषतः कलावादाची फिकीर न करता आपले जीवन साहित्यातून मांडण्याचा अनोखा प्रयत्न केला. त्यामुळे या साहित्य प्रवाहांनी जीवनवादी भूमिका घेऊन रचनेपेक्षा आशयाला अधिक महत्व देण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच दलित साहित्याने इहवादी, लौकिकतावादी भूमिका घेऊन ललित साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजप्रबोधन करताना अनेक लेखक, कवींनी एक विशिष्ट वैचारिक भूमिका घेतलेली आहे. साठोत्तरी कालखंडात आंबेडकरी जाणिवांनी लेखन करणारे साहित्यिक पाहण्यास मिळतात. या कालखंडास 'साठोत्तरी कालखंड' हा शब्दप्रयोग रूढ झाला असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९५६ मध्ये आपल्या लाखो अनुयांयासहित बौध्द धम्मात धर्मांतर केले या घटनेला मराठी साहित्यात महत्वाचे स्थान आहे. म्हणूनच साठोत्तरी या शब्दाऐवजी 'धम्मक्रांतीत्तोर कालखंड' म्हणूनही ओळखला जातो. धम्मक्रांतीचा समाज, साहित्य, लेखक, कवींवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. दलित साहित्यातील पहिल्या पिढीतील अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव, बाबुराव बागूल, शंकरराव खरात, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन होवाळ, दया पवार इत्यादी साहित्यिकांच्या लेखनावर आंबेडकरी विचारांचा आविष्कार पाहण्यास मिळतो. प्रस्तुत शोध निबंधामध्ये 'वामन होवाळांच्या कथेतील वैचारिकता' शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

वामन होवाळांचे कथा लेखन धम्मक्रांतीनंतरच्या कालखंडात सुरू झाले आहे. त्यांच्या कथा लेखनाचा कालखंड हा सन १९७५ नंतरचा आहे. या कालखंडात धम्मक्रांती आणि दलित पँथरचा उदय या दोन मोठ्या घटना घडून गेल्या होत्या. या दोन्ही घटनांचे वामन होवाळ साक्षीदार होते. एवढेच नव्हे तर त्यात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला होता. त्यामुळे याचा त्यांच्या कथा लेखनावर विलक्षण प्रभाव आहे. वामन होवाळांनी आतापर्यंत पाच कथा संग्रह लिहिलेले आहेत. यामध्ये बेनवाड (१९७३), येळकोट (१९८२), वारसदार (१९८६), वाटा-अडवाटा (१९८८) आणि ऑडिट (२००५) या कथा संग्रहांचा समावेश आहे. वामन होवाळांचे अनुभवविश्व हे विविध स्तरातील आहे. त्यांचा जन्म ग्रामीण भागात तडसर जि. सांगली येथे झाला असल्यामुळे त्यांच्या अनुभवविश्वात ग्रामीण परिसर पाहण्यास मिळतो असे असले तरीही त्यांच्या लेखनात ग्रामीण भागातील उच्च नीचता, जातीयता, अंधःश्रध्दा याबरोबरच ग्रामीण जीवनातील रांगडेपणा, बेरकीपणा अशा माणसांच्या स्वभावातील विविध नमुने पाहण्यास मिळतात. पण त्याचबरोबर ग्रामीण जीवनातील जातीयतेमुळे पूर्वास्पृश्य समाजाची होणारी ससेहोलपट, अन्याय, अत्याचार आणि अंधःश्रध्देमुळे माणसांची होणारी फसवणूकही ते मोठ्या कौशल्याने, खुबीने मांडताना दिसतात. याबरोबरच नोकरीच्या निमित्ताने ते मुंबई या महानगरात वास्तव्याला होते. तेथेही पुन्हा दलित, पूर्वस्पृश्य असणाऱ्या समाजात ते राहत. तेथील लोकांचे जीवन ते वास्तवपूर्ण शैलीने मांडताना दिसतात. म्हणून त्यांचे अनुभवविश्व हे शहरी आणि ग्रामीण असले तरी स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण आणि संयत विनोदी शैलीने ते माणसांच्या जीवनातील विरोधाभास तटस्थपणे प्रकट करताना दिसतात.

वामन होवाळांच्या वैचारिकतेचा विचार करताना त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिबा जोतीराव फुले आणि भगवान गौतम बुध्दांच्या विचारांचे संस्कार आहेत. आणि लेखनाचा विचार केला तर त्यांचे लेखन रचनावादापेक्षा आशयाला महत्व देतात. म्हणूनच त्यांचे लेखन हे लौकिकतावादी, इहवादी आहे. वामन होवाळ आपल्या कथा लेखनातून आंबेडकरी विचार मांडून समाजप्रबोधन करीत असतात. म्हणूनच त्यांच्या लेखनाचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांची वैचारिक भूमिका तपासता येते. मुंबई शहर हे आंबेडकरी चळवळीचे प्रमुख केंद्र होते ते स्वतः मुंबईत राहत असल्यामुळे धम्मक्रांतीचा प्रभाव आणि दलित पँथर या लढाऊ संघटनेचा उदय या दोन्ही घटनांचे ते साक्षीदार असल्यामुळे ते आंबेडकरी विचारांचे पाईक झाले होते. तेच विचार त्यांच्या लेखनातून आविष्कृत झाले आहेत.

वामन होवाळांची 'मजल्याचं घर' ही बहुचर्चित असणारी कथा त्यांच्या वैचारिक परिपक्वतेचे उत्तम उदाहरण आहे. या कथेतील नायक बयाजी मुंबई येथे नोकरी करून सेवानिवृत्त होऊन आपल्या मूळ गावी आला आहे. परंतु गावात त्याला राहण्यास चांगले घर नसते. आता तो सेवानिवृत्त झाला आहे. त्यामुळे त्याच्याकडे पैसे असतात. या पैशातून त्याला घर बांधायचे असते. तेही मजल्याचं घर बांधायचं असतं. परंतु गावगाड्यातील लोक त्याला मजल्याचं घर बांधण्यास विरोध करतात. कारण एक दलित माणूस दुमजली घर बांधतो ही कल्पना त्यांना असहाय्य करते. कारण पूर्वापार समजूतीने कोणत्याही दलिताचे आपल्या पायरीने वागले पाहिजे. म्हणजे त्याने सवर्णाशी बरोबरी करता कामा नये. या विचाराने सवर्णांनी त्यास मजल्याचे घर बांधण्यास मज्जाव केलेला असतो. परंतु मुंबई सारख्या शहरात समानतेचे हक्क उपभोगलेला बयाजी निर्धाराने मजल्याचे घर बांधण्याचा निर्धार करतो परंतु गाववाल्यांच्या विरोधामुळे तो एक पाऊल मागे घेऊन घरातल्या घरात दडगा मजला बांधतो ही गोष्ट गावातील सवर्णांना सहन होत नाही. परिणामी बयाजीचे नवीन घर गाववाल्यांकडून जाळले जाते. त्यात बयाजीचा मृत्यू होतो. सवर्ण लोकांकडून दलित असणाऱ्या लोकांवर प्रतिष्ठेच्या पायी कसा अन्याय, अत्याचार होतो याचे चित्रण वामन होवाळांनी केले आहे. परंतु बयाजीच्या पश्चात त्याच्या मुलांनी नवीन मजल्याच्या घराची सुरूवात करताना ते म्हणतात की, "ही घराची सुरूवात आहे. ती बी दडग्या मजल्यांची नव्हं ! दुमजली घराची सुरूवात !" [1] या उद्‌गारावरून बयाजीची मुलं उघडपणे दुमजली घराची पाया भरणी करण्यास सुरूवात करतात. बयाजीच्या मुलांनी उघडपणे सवर्णांशी संघर्ष करायचा इरादा स्पष्ट केला आहे. हा संघर्ष अन्यायाच्या विरोधात आहे. आंबेडकरी विचारांचे बाळकडू या मुलांना प्राप्त झाले आहे. त्यामुळे आपल्या हक्कांसाठी ते संघर्षाला तयार झाले आहेत. आंबेडकरी विचारांची उर्जा त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे. यापाठीमागे दलित पँथरच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचे बाळकडू त्यांना आंबोडकरी चळवळीने प्राप्त झाले आहे.

सन १९५६ च्या धम्मक्रांतीने एका नव्या धम्मसंस्कृतीचा पाया घातला गेला होता. पूर्वीच्या हिंदू संस्कृतीमधील अनेक कालबाह्य गोष्टींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नकार दिला होता. यावेळी ते आपल्या अनुयायांना मार्गदर्शन करताना म्हणाले होते की, "तुमच्या हीन अवस्थेला, अंधःश्रध्दा, जुन्या प्रथा, रूढी कारणीभूत आहेत. त्यांचा आपण प्रथम त्याग केला पाहिजे. त्याचबरोबर परंपरागत गावकीची कामे, हलकी कामे, मृतमांस खाणे, उच्चिष्ट अन्न खाणे, भाकरी वगैरे भीक मागणे या सर्व प्रकाराविरूद्ध मी आहे.. म्हणून अस्पृश्यांनी वरील सर्व प्रकार बंद केले पाहिजेत. त्याशिवाय अस्पृश्यांना सर्वसामान्याप्रमाणे स्वाभिमानाने जगता येणार नाही. त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही." [2] या विचारांचा आविष्कार वामन होवाळांच्या कथामधून जाणवतो. पूर्वास्पृश्य समाजात अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा होत्या, अंधश्रध्दा होत्या. या सर्वामुळे माणुसकीला कलंक लागत होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रथा, परंपरेला विरोध केला आणि आपण त्याचा त्याग केला पाहिजे असा उपदेश केला होता. या विचाराचा आविष्कार वामन होवाळांच्या गिरमीट, देव धावला-देव पावला, उतारा आणि नवी वाट या कथांमधून देवदासीची समस्या आली आहे. देवदासीची प्रथा ही अमानवी आहे. त्यामधून स्त्रियांचे शारीरिक शोषण होते. त्यामुळे या प्रथेला दलितांनी नकार दिला पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. हाच विचार वामन होवाळांच्या उपरोक्त कथामधून आलेला आहे. दुष्ट रूढी, प्रथांनी पूर्वास्पृश्यांना हीन अवस्था प्राप्त झालेली आहे. या प्रथांना त्यांना माणुसकीचे हक्क मिळत नाहीत याचे दुःख वामन होवाळांना आहे म्हणून त्यांनी या प्रथांना उपरोक्त कथामधून विरोध केला आहे. त्यांना नकार दिलेला आहे. हे वैचारिक बळ त्यांना आंबेडकरी विचारांमधून प्राप्त झाले आहे.

पूर्वास्पृश्य समाजाला गावगाड्यातील हलकी कामे करावी लागत असत. यामध्ये मेलेली जनावरे ओढून गावाबाहेर टाकणे गावकीची, तराळकीची कामे, सांगावा सांगणे अशी हलकी कामे अस्पृश्यांना करावी लागत असत. डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी अशा कामांना नकार देऊन स्वाभिमानाने जगा असा उपदेश केला होता. या विचारामधून 'वाटा-अडवाटा' कथेतील राघू दादा देवाची पूजा करणे, सनई वाजविणे, अशा पारंपरिक कामांना नकार देतो. कारण रघुदादा म्हणतो की, "दीक्षा घेताना म्या शपथ खाल्लीया मी देवदेवता मानणार नाही लबाड बोलणार नाही खोटं बोलणार न्हाय" [3] रघुदादा ने हलक्या कामांना नकार दिलेला आहे. नकार देण्याचे बळ त्याला आंबेडकरी चळवळीमुळे प्राप्त झालेले आहे. तर 'बेनवाड' या कथेत बलुतेदारी पध्दत आता संपलेली आहे. हे सांगताना या कथेतील नायक म्हणतो की, "आता तराळ फिराळ काय ऱ्हायलं न्याय सायेब वतन बील पास केल्यापासनं सरकानं गावगन्ना कोतवाल ठेवल्यात." [4] या विचारांमधून अस्पृश्यांनी हलकी कामे करण्याचे नाकारले आहे. हा नकार प्रकट करण्याचे सामर्थ्य त्यांना १९५६ च्या धम्मक्रांतीने आणि दलित पँथरच्या संघर्षामुळे आलेले आहे. धम्मक्रांतीने दलितांना त्यांच्या आत्मस्थितीची जाणीव करून दिली तर दलित पँथर या लढाऊ संघटनेने स्वाभिमानाने जगण्यास शिकविताना आपल्यावर अन्याय झाल्यास ठोशास ठोसा असा आक्रमक संघर्ष करायला शिकविले त्यामुळे वामन होवाळांच्या कथेतील दुसऱ्या पिढीतील तरूणांवर दलित पँथरचा प्रभाव आहे असे दिसते. उदा. मजल्याचं घर, मधील बयाजीची मुलं गावकऱ्यांशी उघड उघड संघर्ष करायला तयार झालेली आहे किंवा 'बेनवाडं' मधील शामू साहेबांच्या नजरेला नजर देऊन म्हणतो की, "आता तराळ-फिराळ काय ऱ्हायलं न्हायीत सायेब" [5] यामधून वामन होवाळ आपल्या कथांच्या माध्यमातून आपला स्वाभिमान जागृत करतात हे वैचारिक बळ त्यांना दलित पँथरच्या चळवळीमधून आणि आंबेडकरी विचारामधून प्राप्त झाले आहे.

आंबेडकरी विचारांचे जनजागरण समाजात झाल्यामुळे पूर्वास्पृश्य समाजातील लोक बाबासाहेबांच्या उपदेशाप्रमाणे स्वाभिमानाने जगण्यात तयार झाले आहेत. ते समतेची भाषा करू लागले आहेत. आपल्यावर अन्याय झाल्यास आता ते जाब विचारू लागले आहे. सवर्णांनी जर दलितांच्यावर अत्याचार केला तर ते त्यांच्या नजरेला नजर भिडवू लागले आहेत. याचे चित्रण करताना वामन होवाळ 'काळं-पाणी' या कथेत चित्रण करताना मिलिंदनगर मधील पूर्वास्पृश्यांनी बौध्द धम्म स्वीकारून मेलेली गुरे ओढणे अशा कामांना नकार दिला आहे. त्याबद्दल गावातील पाटील म्हणतो की, "लेकांनो जरा रीतीभातीने वागत चला." [6] यावर आत्मभान प्राप्त झालेले आणि आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेले तरूण पाटलाला प्रत्युत्तर देताना म्हणतात की, "... पण आमच्यावर हे अत्याचार किती दिवस चालणार हायेत." [7] गावच्या पाटलाला हे तरून प्रत्यत्तर देण्याचे धाडस करतात हे विशेष आहे. हे सामर्थ्य त्यांना आंबेडकरी चळवळीमुळेच प्राप्त झालेले आहे.

पूर्वास्पृश्य समाजातील लोकांनी १९५६ मध्ये बाबासाहेबांच्या बरोबरीने बौध्द धम्म स्वीकारला. नवी बौध्द धम्म संस्कृती स्वीकारली ती बौध्द धम्म संस्कृती समाजात प्रस्थापित केली. हे वामन होवाळांच्या 'जयंती' या कथेमधून प्रकट होताना दिसते. हिंदू धर्म व्यवस्थेतील लोक परस्परांना अभिवादन करताना आणि आपल्या नावापुढे 'श्री' असे लिहितात किंवा तसे संबोधतात. परस्परांना अभिवादन करताना नमस्कार म्हणतात. या गोष्टींना 'जयंती' या कथेत नकार दिलेला आहे. बौध्द धम्म संस्कृतीचा स्वीकार केलेला असल्यामुळे ते श्री च्या ऐवजी आयुष्मान ही शब्द वापरतात तर परस्परांना अभिवादन करताना नमस्काराच्या ऐवजी 'जयभीम' हा शब्द वापरतात. त्यामुळे वामन होवाळांच्या कथेतील पात्रे आंबेडकरी जाणिवांचा स्वीकार करताना दिसतात.

वामन होवाळांनी आंबेडकरी उर्जा घेऊन लेखन केले आहे. परंतु त्यांच्या काही कथांमधून आत्मपरीक्षण करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. दलित समाजातील सर्वांनीच धर्मांतर केले नाही. काही लोकांनी धर्मांतर केले पण अजुनही ते जुन्याच मानसिकतेत आहे. त्यांच्यात वैचारिक भ्रष्टता आलेली आहे. हे 'तपास' या कथेमधून प्रकट करतात त्या कथेतील हरिबापू माने साहेबांच्या विषयी म्हणतात की, "शेवाळे सारं खरं पण ह्यो माने साहेब आपल्यापैकीच हाय का ?"[8] या प्रश्नावर शेवाळे म्हणतात की, "हो तर ! साहेब मागासवर्गीया पैकीच हायेत"[9] परंतु हरिबापूंना त्यांची जात कोणती आहे हे विचारायचे असते ते स्पष्ट होत नाही. म्हणून ते अधिक स्पष्ट व्हावे म्हणून म्हणतात की, "मागासवर्गीय हायेत ते झालं हो ! पण मी म्हणतो ते आपल्यापैकीच हायेत का ?"[10] या प्रश्नावरून लक्षात येतं की, हरिबापूंनी बौध्द धम्मात धर्मांतर करून सुध्दा ते अजूनही जुन्याच मानसिकतेत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती अंताची लढाई सुरू केली होती परंतु जुन्याच हिंदू मानसिकतेत अडकलेल्या लोकांनी विशेषतः हरिबापू जातीचा अभिमान बाळगणारे आहेत. हे समाज वास्तव प्रकट करताना दलितांनी आत्मपरीक्षण करावे असे त्यांना सूचवायचे आहे. तर 'जात दाखला' या कथेत सुशिक्षित असणारा माणूस स्वार्थासाठी आपल्या मुलाच्या शाळेच्या दाखल्यावर हिंदू-महार असा जातीचा उल्लेख करून घेतो. एवढेच नव्हे तर आपल्या अशिक्षित असणाऱ्या भावाला त्याच्या मुलाच्या जातीच्या दाखल्यावर हिंदू-महार असा बदल करायला सुचवितो यावरून वामन होवाळांनी आपल्या समाजातील लोकांच्या स्वार्थीपणावर बोट ठेवून आत्मपरीक्षण करायला भाग पडले आहे.

वामन होवाळांच्या कथांचा अभ्यास करताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते, ती म्हणजे ज्यांनी बौध्द धम्माचा स्वीकार केला आहे अशी अशिक्षित माणसे बाबासाहेबांच्या विचारानुसार आचरण करताना दिसतात. उदा. 'वारसदार' या कथेतील निवेदकाचा दादा खेड्यात राहणारा आहे. तो बाबासाहेबांच्या विचारानुसार जगणारा आहे. तो आपल्या मुलाची जात हिंदू-महार अशी लावत नाही. तर तो बौध्द असा उल्लेख जातीच्या ठिकाणी करतो. बौध्द धम्मात जातीयता नाही असे तो सांगतो म्हणजे खेड्यात राहणारा दादा खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचा वारसदार आहे. हा दादा आपल्या लहान भावाला खडसावून सांगताना म्हणतो की, "तू ह्याच कामासाठी आला असशील तर आत्ताच्या आत्ता चालता हो. मला त्वांड पन दाखवू नको."[11] वाटा अडवाटा या कथेमधील रघुदादा भावकीच्या कामांना नकार देताना म्हणतो की, "दीक्षा घेताना म्या शपथ खाल्लीया. मी देव देवता मानणार नाही. लबाड बोलणार नाही. खोटं बोलणार नाही."[12] 'नवी वाट' मधील सागरूचा मुलगा पोतराजाच्या कामास नकार देतो. अशा रितीने अशिक्षित असणारी माणसे बौध्द धम्माचे आचरण करताना दिसतात. परंतु सुशिक्षित असणारी माणसे स्वार्थी, आपमतलबी आहेत याचे प्रत्यंतर वामन होवाळांच्या कथा वाचताना येते.

वामन होवाळांच्या कथेत विविध आशय सूत्रे आहे. परंतु प्रस्तुत शोध निबंधात 'वामन होवाळांच्या कथेतील वैचारिकता' याचा शोध घेत असताना वामन होवाळ हे एक प्रागतिक विचारांचे लेखक आहेत. त्यामुळे त्यांच्या कथात्म साहित्यात पुरोगामी विचारांचा आविष्कार पाहण्यास मिळतो. ते स्वतः बुध्दिवादी, विवेकनिष्ठ, इहवादी, लौकिकतावादी असून फुले, आंबेडकरी विचारांची उर्जा त्यांच्या लेखनातून प्रत्ययाला येताना दिसते. याबरोबरच अनिष्ट प्रथा, परंपरांना नाकारत अंधःश्रध्देला मूठमाती देत ते प्रागतिक विचाराची कास धरताना दिसतात म्हणूनच वामन होवाळ हे आंबेडकरी विचारांचे पाईक आहेत. हेच त्यांचे बलस्थान आहे असे वाटते.

### संदर्भ टिपा

१) वामन होवाळ : 'बेनवाड' स्वयंदीप प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९७३, पृ. ३३.
२) शंकरराव खरात : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आत्मकथा', इंद्रायणी साहित्य पुणे, प्र. आ. १९८७, पृ. ४१
३) वामन होवाळ : 'वाटा-अडवाटा' स्वयंदीप प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८८, पृ. ७२.
४) वामन होवाळ : 'बेनवाड' उनि. पृ. १३९.
५) वामन होवाळ : तत्रैव, पृ. १३९.
६) वामन होवाळ : 'वारसदार', स्वयंदीप प्रकाशन, मुंबई. प्र. आ. १९८६, पृ. १०५.
७) तत्रैव, पृ. १०५.
८) वामन होवाळ : 'ऑडिट', निशिराज प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००३, पृ. १३.
९) तत्रैव पृ. १३.
१०) तत्रैव पृ. १३.
११) वामन होवाळ : 'वारसदार', उनि, पृ. १३४.
१२) वामन होवाळ : 'वाटा-अडवाटा', उनि. पृ. ७२.